Shivaji College Hingoli

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023

(CCCLXXXVIII ) 388 C

## ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE DEVELOPMENT



Chief Editor

Prof. Virag S. Gawande

Director

Aadhar Social

Research & Development

Training Institute Amravati

Editor

Dr.Dhale S.U.

Head Department of Political Sci.

Shivaji College, Hingoli

Tq.Dist.Hingoli (MS)

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar PUBLICATIONS

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISSN – 2278-9308

Impact Factor – 8.575

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

**FEBRUARY -2023**

**ISSUE No - (CCCLXXXVIII) 388 -C**

## ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SUSTAINABLE

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Dr.Dhale S.U.**
Editor,
Head Department of Political Sci.,
Shivaji College, Hingoli Tq.Dist.Hingoli (MS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII ) 388- C

ISSN : 2278-9308

Fabruary, 2023

Shivaji College Hingoli


| | | |
|---|---|---|
| 21 | पर्यावरणाचा ऱ्हास आणि शाश्वत विकास डॉ.रेखा बालाजीराव पाटील | 75 |
| 22 | भारतातील कृषी क्षेत्रावरील हवामान बदलाचा परिणाम प्रा. डॉ.शिवाजी पाते | 80 |
| 23 | पर्यावरणीय अर्थशास्त्र आणि शाश्वत विकासतील अडथळे प्रा. देविदास गोकुळ गवळी | 84 |
| 24 | हवामानबदलाचे महाराष्ट्रातील शेतीवरील परिणाम एक अभ्यास प्रा. डॉ. रेणुकादास यशवंत बोनर | 87 |
| 25 | वाढता विकास आणि पर्यावरणाचा असमतोल प्रा. डॉ. रामदास धो.मुकटे | 93 |
| 26 | महाराष्ट्रातील पर्यावरण विषयक चळवळी डॉ. रामभाउ भाकरे | 96 |
| 27 | शाश्वत विकास संकल्पना व स्वरुप प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके | 100 |
| 28 | पर्यावरण संवर्धन आणि मानवी हक्काचे रक्षण एक समाजशास्त्रीय अध्ययन दलित सुभाषराव कांबळे , प्रा. डॉ. दीपक सु.धारवाडकर | 104 |
| 29 | ग्रामीण साहित्यातील निसर्गदर्शन प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | 110 |
| 30 | पर्यावरण अभ्यास काळाची गरज प्रा. डॉ. व्यंकटेश काळुराम मदनुरे | 114 |
| 31 | खेळाच्या माध्यमातून शाश्वत पर्यावरणाचा प्रचार- प्रसार आणि पर्यावरण संतुलन - एक अभ्यास प्रा. डॉ.गुणाजी पांडुरंग नलगे | 117 |
| 32 | मराठी साहित्यातून आलेले पर्यावरण भान प्रा.डॉ. संगीता मुंढे | 120 |
| 33 | रंगनाथ पठारे यांच्या कथेतील व्यक्तिरेखांचे चित्रण प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील ,केशव विठ्ठल कोकाटे | 124 |
| 34 | नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन व नैसर्गिक संसाधनांवर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे. कु. अश्विनी रोहिदास भोईर, | 128 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C

ISSN : 2278-9308 Fabruary, 2023

# मराठी साहित्यातून आलेले पर्यावरण भान

प्रा.डॉ. संगीता मुंढे

मराठी विभाग शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

ईमेल – sangitamundhe1@gmail.com मो - 8888061365

प्रस्तावना –सजीवांच्या नैसर्गिकपरिसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक परिभाषा कोशानुसार पर्यावरण म्हणजे,"वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात,वाढतात, तेथील हवा,जमीन,पाणी,पर्जन्यमान,उंची, तापमानई. सर्वांचा समावेश पर्यावरणात होतो." म्हणजेच माणसाच्या आजूबाजूचा प्रत्येक घटक हा पर्यावरण असतो. माणूस हा एक समाजशील प्राणी आहे तो समाजात राहतो.याचाचअर्थ तो पर्यावरणाचा एक घटक आहे.बोलीभाषा,संस्कृती,रूढी,परंपरा, जीवन जाणिवा हे सर्वच पर्यावरणाशी निगडित आहे. पर्यावरण आणि मानवी संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे. तसेच साहित्य आणि पर्यावरण यांचाही अन्योन्य अशा प्रकारचा संबंध आहे. समाजाचा सर्वांगीण विकास हा पर्यावरणावर अवलंबून असतो. पर्यावरणच माणसाचं जीवन समृद्ध आणि संपन्न करत असतं. त्यामुळे खूप मोठा प्रभाव पर्यावरणाचा मानवी जीवनावर पडत असतो.पर्यावरण शास्त्रामध्ये पर्यावरणाचा सर्वांगीण अभ्यास हा होत असतो.प्रा. बर्नार्डनोबेलयांच्यामते, "पर्यावरण शास्त्र म्हणजे विविध परिसंस्था प्रणालींच्या परस्पर संबंधाचे संतुलन तत्वांचे शास्त्रीय अध्ययन होय. पर्यावरणातील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांचा मानवी जीवनावर, जीवन पद्धतीवर होणाऱ्या प्रभावांचा पद्धतशीर व शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेला अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय."१मानवी संस्कृती ही पर्यावरणाशी निगडित आहे. सर्व सजीवच या पर्यावरणाचा एक घटक आहेत. आपल्या आजूबाजूचे पर्यावरण आपल्याला घडत असते. साहित्यिक हा आपल्याला आलेले जीवनानुभवच साहित्यातून मांडत असल्यामुळे त्याच्या आजूबाजूला असलेले हे पर्यावरण त्याच्या साहित्यातून चित्रित होत असते. मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे घटक, मानवी जीवनात झालेले बदल या सर्वांचं चित्रण साहित्यातून आलेले आहे. त्याचबरोबर मानवी जीवनाच्या बदलाबरोबरच निसर्गात किंवा पर्यावरणात झालेले बदल याचेहीचित्रण मराठी साहित्याने केले आहे.

अगदी प्राचीन काळापासून पर्यावरण आणि माणूस यांचा सहसंबंध याचे चित्रण मराठी साहित्यामध्ये आलेले आहे.जेंव्हा मुद्रण कला अवगत नव्हती, लिपीचा शोध लागलेला नव्हता, तेव्हा लोकसाहित्यातून मानवी जिवनानुभव प्रकट झालेले दिसतात.लोककथा,लोकगीत,लोकनृत्य, लोकनाट्य इत्यादी लोकसाहित्याच्या वेगवेगळया प्रकारातून मानवी जीवनानुभवव्यक्त झालेले आहेत. त्यातून निसर्ग आणि माणूस यांचा अतूट असा संबंधअसल्याचे दिसून येते. लोककथा,नितीकथा, लोकगीत यातून निसर्गाशी असलेले माणसाचे अतूट नाते प्राणी,पशु, पक्षी यांचा मानवी जीवनातील सहसंबंध लक्षात येतो. जेव्हा लिपीचा शोध लागला. लिखित साहित्य निर्मिती होऊ लागली तेव्हापासून माणूस आणि निसर्ग यातील सहसंबंधलिपीबद्ध झाला. सुरुवातीच्या काळात माणूस हा आपले जीवन अनुभव झाडाच्या पानावर बोरूच्या काडीच्या सहाय्याने लिहून ठेवत असे, म्हणजे माणसाच्या प्रत्येक प्रगतीमध्ये जडणघडणीमध्ये पर्यावरणाचा मोलाचा हातभार आहे. त्याच्या साह्यानेच मानवाने प्रगती केलेली आहे.इतर सजीवांच्या मानाने माणसाला मिळालेले एक वरदान म्हणजे त्याची बुद्धी या बुद्धीच्या बळावर त्याने आपली प्रगती करून घेतली. जसजशी वैज्ञानिक प्रगती होत गेली तस तसा मानवी जीवनात अमुलाग्र असा बदल झाला. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आपल्याला पाहिजे त्या पद्धतीने माणसाने वेगवेगळे यंत्र बनवले. निसर्गाला आपल्या परीनेवाकवण्याचा,आपला गुलामबनवण्याचा तो प्रयत्न करू लागला. यातूनच पर्यावरण हे मानवी हव्यासाचे शिकार झाले. त्यामुळे संपूर्ण मानवजात नाही तर संपूर्ण सजीवसृष्टी संकटात सापडलेलीदिसते. अनेक पर्यावरणीय समस्या आज आपल्यासमोर आवासून उभ्याआहेत. ग्लोबल वार्मिंग, निसर्गाचा लहरीपणा, बदललेले ऋतुचक्र,जल, वायू

प्रदूषण, पशुपक्षी प्राणी यांची घटती संख्या या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर होत असलेला आपल्याला पाहायला मिळतो. या बदलत्या जीवनाचे चित्रण मराठी साहित्याने केले आहे.

मराठी साहित्याची गंगोत्री म्हणून महानुभाव संप्रदायाच्या साहित्याला म्हटले जाते.'लीळाचरित्र','गोविंदप्रभूचरित्र' यांच्यातून माणूस आणि निसर्ग यांचं अतूट असं नातं लक्षात येतं. चक्रधर स्वामींनी प्राणी, पशुपक्ष्यांवर प्रेम करण्याचा संदेश दिला आहे.अहिंसेच तत्त्वज्ञान तेराव्या शतकातच चक्रधरांनी सांगितलं होतं.'ऋद्धीपूरवर्णन' हा संपूर्ण ग्रंथ तर निसर्ग वर्णन करणारा असा ग्रंथ आहे. निसर्गाची थोरवी, मोठेपण त्या काळातही गायलेगेलेआहे. माणसाचं जगणं समृद्ध, संपन्न करण्याचं काम निसर्ग करत असतो. संतांनीही आपल्या साहित्यातून निसर्गाची महती वर्णनकेलीआहे. निसर्ग आणि माणूस यांना वेगवेगळे काढताच येत नाही. दोन्हीचा अन्योन्य असा संबंध आहे. संत तुकारामांनी निसर्ग प्रतिमांच्या साह्याने मानवाला नैतिक मूल्य, शाश्वत ज्ञान दिले आहे. निसर्ग हा आपल्या जगण्याचा अविभाज्य अंग आहे.हे त्यांनी त्यांच्या अभंगातून निसर्ग प्रतिमांच्या साह्याने सांगितले. ते म्हणतात,

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे
ही सुस्वरेआळविती
येणे सुखेरुचे एकांताचा वास
नाही गुण दोष अंगायेत
आकाश मंडप पृथिवीआसन
रमे तेथे मन क्रीडा करी." म्हणजेच आपल्या सग्यासोयऱ्याप्रमाणे ही वृक्षवल्ली आहे. ती सुखदुःखात आपल्याला साथ देते.त्याच्या सानिध्यामध्ये माणसाला सुख,शांती, समाधान लाभते. असे संत तुकारामांचे म्हणणे आहे. त्यामुळेच तुकारामांना जी ज्ञानाची प्राप्ती झाली ती भामरागड या डोंगरावरच निसर्गाच्या सानिध्यातच.

शिवकाळात शिवाजी महाराजांनी या पर्यावरणाच्या साह्याने शत्रूवर विजय मिळवला. स्वराज्याची स्थापना केली; पण या पर्यावरणाची काळजी ते खूप चांगल्या पद्धतीने घेत.जेव्हा स्वराज्याच्यारक्षणासाठी आरमाराची उभारणी करायचे ठरले, तेव्हा त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना स्पष्ट अशा सूचना दिल्या होत्या की कोणीही वाळलेल्या झाडाशिवाय दुसरे झाड तोडणार नाही. फळझाडे तोडण्याला त्यांचा सक्तविरोध होता. म्हणजेच यातून आपल्याला समजते की, महाराज पर्यावरणाच्या बाबतीत किती सजग होते.

आधुनिक मराठी साहित्यात कथा,कादंबरी,कविता, नाटक इत्यादी वेगवेगळया वांङ्मय प्रकारातून मानवी जीवनात झालेले बदल,परिवर्तन याचे चित्रण आले आहे. पर्यावरण हा मानवी जीवनावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक आहे.ओला, कोरडा दुष्काळ,महापूर,चक्रीवादळ इत्यादी नैसर्गिक संकटाची व त्यामुळे होणाऱ्या मानवी जीवनाच्या वाताहतीचे चित्रण अनेक साहित्य प्रकारातून आले आहे. बहिणाबाई चौधरी,बालकवी,ना.धो.महानोर,कुसुमाग्रज,बा.भ.बोरकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, मांडूळकर इत्यादी कवींनी आपल्या कवितेतून निसर्गाच्या लोभस हव्याहव्याशा अशा रूपाचे दर्शन घडवले आहे. निसर्ग हा माणसाचा सखा,सोबती, सहचर म्हणून वावरताना दिसतो. बालकवींना तर निसर्गकवी म्हणूनच ओळखले जाते. इतके ते निसर्गाशी तादात्म्य पावले होते. त्यांच्या कवितेतून हा निसर्ग चैतन रूप घेऊन वावरताना दिसतो.डॉ. दत्तात्रय पुंडे व डॉ. स्नेहल तावरे लिहितात,"निसर्गाबद्दलची एक कमालीची आसक्ती बालकवींच्या प्रतिभेला होती. निसर्गाच्या दिव्य स्वर्गीय अशा सौंदर्याने त्यांच्या मनाला मोहिनी पडत असे, मग त्यांचे मन निसर्गाशी मनसोक्त क्रीडा करू लागत आणि निसर्गाशी त्यांचे तादात्म्य निर्माण होत असे."२बालकवी म्हणतात,

"आनंदीआनंद गडे
जिकडे तिकडे चोहीकडे
वरती खालती मौदभरे
वायु संगे मोद फिरे
दिशात भरलानभात उरला"
मोद विहरतोचोहीकडे."अशा पद्धतीने त्यांना निसर्गाच्या सानिध्यामध्ये आनंदाची प्राप्ती होत असे. माणसाचे भरण पोषण तर हा निसर्ग करतोच पण त्याचबरोबर त्याचं जगणं सुंदर,समृद्ध तो करत असतो. निसर्ग हा कायम माणसाला देत आला आहे. माणसाने मात्र स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्गाला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला.

Shivaji College Hingoli

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVIII) 388- C
ISSN : 2278-9308
Fabruary, 2023

त्याच्यावर वर्चस्व प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तेव्हा मात्र निसर्गाने माणसाला त्याची जागा दाखवून दिलेली दिसते.

काळानुसार मराठी साहित्यामध्ये मोठे बदल झाले. मानवी जीवनाच्या बदलाबरोबर साहित्यही बदलत गेलं, कारण साहित्य हे मानवी जीवनाचं प्रतिबिंब असतं. अनेक वेगवेगळया साहित्य प्रवाहातून हे साहित्य व्यक्त होताना दिसतं. खास करून ग्रामीण आणि आदिवासी साहित्यातून बदलणाऱ्या पर्यावरणाचे चित्रण मोठ्या प्रमाणावर आलेलेआहे. ग्रामीण बोलीभाषा, शेतशिवाराशी निगडित असलेला माणूस,त्याचे आणि शेतीचं असणार नातं, त्यात होत गेलेला बदल,अस्मानी, सुलतानी संकट या सर्वांचे चित्रण ग्रामीण साहित्यातून मोठ्या प्रमाणावर आले आहे. रा.र. बोराडे यांची 'पाचोळा' किंवा आनंद यादव यांच्या 'गोतावळा'या कादंबऱ्यातून बदलत गेलेल्या मानवी जीवनाचं, त्याने केलेल्या भौतिक प्रगतीचे त्यामुळे गाव गाड्यावर झालेल्या परिणामाचे,चित्रण पाहायला मिळतं. माणूस हा जसजसा निसर्गापासून दूर गेला त्याचा परिणाम त्याच्या जीवनावर झालेला दिसतो. मानवाने जसजशी भौतिक प्रगती केली तसतसं त्याचं जीवन अधिकबेगडी,स्वार्थी होत गेलेलं दिसतं. स्वतःच्या अतिरेकी हव्यासामुळे मानवाने पर्यावरणावर आक्रमण केलं आणि स्वतःच्या हाताने भावी संकट ओढून घेतलं.

अलीकडच्या काळात संपूर्ण मानव जात करोना सारख्या महामारीच्या संकटात सापडलेली आपण पाहिली. हे सुद्धा माणूस आणि निसर्ग यांच्या बिघडलेल्या नातेसंबंधाचा परिपाक असं म्हणता येईल. मोठी मोठी महानगरं म्हणजे सिमेंट कॉंक्रिटची जंगले झाली आहेत. माणसाला जगण्यासाठी आवश्यक असलेली शुद्ध हवा सुद्धा महानगरात आज मिळत नाही.अशोक नायगावकर म्हणतात,

"अनाथ गावाच्या वेशीतुन
शहर इथे वस्तीला आले
आणि मोकळा श्वास विसरूनि
कुबट मनाच्या कुशीत शिरले."३

आपले गाव सोडून लोक पोटापाण्यासाठी शहरात वस्ती करू लागले आणि गावे ओस पडत चालली. शहरे फुगत चालली.आणि त्यातूनच भरमसाठ झोपडपट्ट्यांची व कारखान्याची निर्मिती झाली. त्याचा परिणाम म्हणूनसंध्याचीमहानगरांमधीलहवा प्रदूषणाची आकडेवारी जर पाहिली तर काही वर्षातच ही मोठी महानगरे माणसाच्या निवासाच्या दृष्टीने बिनकामाची ठरण्याची शक्यता आहे. पुन्हा एकदा माणसाला निसर्गाकडे जाण्याशिवाय पर्याय नाही हेच यातून दिसते. बदललेल्या महानगरीय जीवनाचे चित्रण करणारा एक नवीन प्रवाह मराठी साहित्यात अलीकडच्या काळात निर्माण झालेला आहे. यातून फुगत चाललेली शहरे, बकाल झालेली खेडी, वाढत्या झोपडपट्ट्या,किड्या, मुंगीसारखे माणसाचे जगणेनिसर्गाचा असमतोल, बिघडलेले ऋतुचक्र,अतिवृष्टी, दुष्काळ या पर्यावरण समस्यांचा विचार येतो.

प्रसार माध्यमाच्या सहाय्याने ज्या पद्धतीने समाजावर प्रभाव टाकला जातो. त्याच पद्धतीने साहित्याच्या माध्यमातूनही काही अनुकूल बदल हे समाजामध्ये घडवून आणले जातात.एक विशिष्ट मतप्रवाह निर्माण करण्याचं काम अगदी प्राचीन काळापासूनसाहित्याने केले आहे. त्यामुळेअलीकडच्या काळात'पर्यावरणीय समीक्षा' ही एक ज्ञानात्मक संकल्पना उदयास आलेली दिसते. या समीक्षा पद्धतीत माणसाने स्वतःचे जगणे कसे संकटात टाकले आहे, याची जाणीव करून दिली जाते. पर्यावरण विषयक जाणीव जागृती, पर्यावरण भान निर्माण करण्याचा प्रयत्न या प्रकारच्या साहित्यातून केला जातो. मानवी जीवनाच्या दृष्टिकोनातून पर्यावरणाचे झालेले नुकसान हे एक संपूर्ण मानव जातीवरील संकट आहे. त्यामुळे ते कसे दूर करता येईल याचेही चित्रण मराठी साहित्यातून येऊ लागलेआहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पहिले पर्यावरण प्रेमी साहित्य संमेलन पुणे येथे 22 फेब्रुवारी 2012 साली संपन्न झाले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष निसर्ग कवी म्हणून ओळखले जाणारे ना.धो. महानोर हे होते. दरवर्षी पुण्यात हे संमेलन भरवले जाते. वेगवेगळ्या पर्यावरण विषयक समस्येवर चर्चा, उपाययोजना सुचवल्या जातात. पर्यावरणवादी साहित्याला यातून चालना दिली जाते.

आपली मराठी संस्कृती ही निसर्गाशी. पर्यावरणाशी निगडित अशी संस्कृती आहे. आपले सण,वार,प्रथा, परंपरा या निसर्गानुसार चालतात.बैलपोळा,नागपंचमी,गुढीपाडवा, चैत्र गौरी, गौरी पूजन इत्यादी सण हे पर्यावरण समतोल

व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतात. माणूस आणि निसर्ग यांचं अतूट असे नातं दर्शवितात. काळाच्या ओघात आपण आपली संस्कृती ही विसरत चाललो आहोत.भौतिक विकासाच्या नादात आपण यंत्राप्रमाणे यंत्रवत होत चाललो आहोत.माणूसकी, सहवेदना,बंधुभाव, पर्यावरण रक्षण,नैतिक मूल्य ही माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक मूल्य माणूस विसरत चाललाआहे. त्यामुळे आपली वागणूक पशुवतझाली आहे. संपूर्ण मानवी सृष्टी जर टिकून ठेवायची असेल तर, आपल्याला आपण पर्यावरणाचा एक घटक आहोत हे विसरून चालणार नाही. पर्यावरण जर टिकले तरच मानवी जीवन टिकेल हे माणसाने वेळीच ओळखून त्याच्या रक्षणासाठी कटिबद्ध होणं ही काळाची गरज आहे.समाजाला दिशा देण्याचं, मार्ग दाखवण्याचं काम साहित्य हे नेहमीच करत असतं त्यामुळे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टिकोनातूनही जास्तीत जास्त साहित्य निर्मिती होणे गरजेचे आहे.

निष्कर्ष १) माणूस हा एक पर्यावरणाचा घटक आहे

२) पर्यावरणच माणसाचं जीवन घडवत असतं.

३) साहित्य हे मानवी जीवनाचं प्रतिबिंब असतं.

४) बदलत गेलेल्या पर्यावरणाचे चित्रण मराठी साहित्यातून आलेले आहे.

संदर्भ: १) डॉ. पुंडे दत्तात्रेय व डॉ.तावरे स्नेहल,त्रिदल-स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. आवृत्ती दुसरी १९९४ पृष्ठ ०५

२) प्रा. कुलकर्णी शिल्पा,प्रा. बर्नार्ड नोबेल पर्यावरण व समाज - डायमंड पब्लिशिंग,पुणे. प्रथम आवृत्ती २००८पृ.०२

३) नायगावकर अशोक, कवितामुंबईच्या -यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक. प्रथम आवृत्ती २०११पृ.१११

Shivaji College Hingoli

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)